सन २०२६ मधील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा टंचाई परिस्थितीत मुरघास आणि सुक्या चाऱ्याची किंमत निश्चित करणे बाबत.....

महाराष्ट्र शासन

पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांक : DAHD-१४०३४/५४/२०२६-DAHD-AH४ (E-१८६९५२८)

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक :-३० ऑक्टोबर, २०२६

संदर्भ :-

१) शासन निर्णय क्र. कृवपदुम ३३०११/५/२०२३/एमएजी/पदुम ४ (E- ६६२१५१), दि. १४/०९/२०२३

२) मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती २०२६/ प्र.क्र. ८२/ म-२, दि. २५/०९/२०२६ व दि. १४.१०.२०२६

३) दि. २९/०९/२०२६ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

४) शासन निर्णय क्रमांक- DAHD- १४०३४/५४/२०२६-AH४ (E- १८६९५२८), दि. ०६/१०/२०२६

५) दि.२७/१०/२०२६ या अभ्यास गट समितीचा अहवाल

६) दि. २७/१०/२०२६ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक.

प्रस्तावना :-

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार २०२६च्या खरीप हंगामातील परिस्थितीच्या आधारे मुल्यांकन करुन मदत व पुनर्वसन विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५/०९/२०२६ अन्वये २६५ तालुके व शासन निर्णय क्र. दिनांक १४/१०/२०२६ अन्वये ३९ तालुके अशा एकूण राज्यातील ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.

२. राज्यातील दुष्काळजन्य परिस्थिती व त्यातुन उद्भणाऱ्या पाणी टंचाई व चारा टंचाई यासारख्या समस्यांवर उपाययोजना सुचविण्यासाठी तसेच बाधित होणाऱ्या शेती व शेतीपुरक व्यवसायांना वेळोवेळी आवश्यक मदतीचा आढावा घेण्यासाठी मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक २२/०९/२०२६ अन्वये गठित करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये चारा टंचाईवर उपाययोजना सुचविण्यासाठी अप्पर मुख्य सचिव, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय दिनांक ०६/१०/२०२६ अन्वये अप्पर मुख्य सचिव, (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट गठीत करण्यात आला आहे. सदर अभ्यासगटाने राज्यात व इतर राज्यात यापुर्वी केलेल्या/करण्यात येत असलेल्या चांगल्या उपाययोजनांचा अभ्यास करुन तसेच संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत अभ्यासगटाने अहवाल तयार केला आहे.

३. दिनांक २७/१०/२०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत अभ्यासगटाने सादर केलेला अहवाल स्विकारण्यात आला आहे. अभ्यासगटाच्या शिफारशींपैकी सुका चारा व मुरघास यांचे दर अनुक्रमे कमाल रु.१२/- (वाहतुक खर्च वगळून) व कमाल रु.८/-(वाहतुक खर्च वगळून) प्रती किलो अशी आधारभूत किंमत निश्चित करणे ही एक शिफारस आहे. वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मुरघासाचे दर निश्चित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णय अधिक्रमित करण्याची व अभ्यासगटाने शिफारस केलेली सुधारीत आधारभूत किमतीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

४. राज्यातील संभाव्य चारा टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी गठित करण्यात आलेल्या अभ्यासगटाने सादर केलेल्या अहवालास मा. मंत्री, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीने दिनांक २७/१०/२०२६ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे. अभ्यासगटाने सुका चारा व मुरघास यांचे दर अनुक्रमे कमाल रु.१२/-(वाहतुक खर्च वगळून) व कमाल रु.८/-(वाहतुक खर्च वगळून) प्रती किलो अशी आधारभूत किंमत निश्चित केली आहे. यास्तव वाचा क्र. १ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन अभ्यासगटाने शिफारस केलेल्या दरास खालील अटींच्या आधीन राहून मान्यता देण्यात येत आहे:-

१) सुका चारा व मुरघास यांचे दर अनुक्रमे कमाल रु.१२ (वाहतुक खर्च वगळून) व कमाल रु.८ प्रती किलो (वाहतुक खर्च वगळून) अशा आधारभूत किंमती या मदत व पुनर्वसन विभागाने जाहीर केलेल्या सन २०२६-२७ मधील दुष्काळाच्या कालावधीसाठी लागू राहतील.

२) अभ्यासगटाने अहवालातील प्रकरण क्र. ६ अन्वये शिफारस केलेल्या "जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन कार्यकारी समिती"ने खरेदीबाबत अहवालात विहित केल्याप्रमाणे तसेच मदत व पुनर्वसन विभागाने वेळोवेळी दिलेल्या/देण्यात येणाऱ्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.

३) वाहतूक दर आयुक्त, परिवहन यांनी वेळोवेळी निर्धारित केल्याप्रमाणे लागू राहतील.

५. **चाऱ्याची मानके:-**

अ) सुका चारा :-

१) ओलावा (Moisture Content) - कमाल १५ % पर्यंत

(संदर्भ:-Text book of Animal Husbandry by G.C, Banerjee)

२) चारा चांगला दिसणारा, आंबट, कुबट वास नसलेला, तसेच बुरशी माती/कीड/नसलेला असावा

३) ज्वारी, बाजरी यांना प्राधान्य

आ) मुरघास :-

१. खरेदी करण्यात येणारा मुरघास हा हवाबंद अवस्थेत असावा.

२. खरेदी करण्यात येणाऱ्या मुरघासास कोणत्याही बुरशीचा प्रादुर्भाव झालेला नसावा.

३. मुरघासमध्ये खालील प्रमाणे शुष्क घटकांचे (ड्राय मॅटर) प्रमाण असावे:-

Sr. No.	Parameters	Percentage
१	Moisture, percent by mass	६२-७०
२	pH	३.५-४.४
३	Crude Protein percent by mass minimum	७.०
४	Crude Fiber, percent by mass max / NDF (Neutral Detergent Fiber)	३५/६०
५	Acid Insoluble Ash, percent by mass max	५
६	Alfatoxin B_1 (ppb) max	२०

(संदर्भ:- भारतीय मानक ब्युरो आयएस १९५६२ : २०२६)

६. सुका चारा व मुरघासातील विविध घटकांची तपासणी करण्यासाठी खालील प्रयोगशाळांमध्ये तपासणी सुविधा उपलब्ध आहे.

१. पशुसंवर्धन विभागांतर्गत पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, गोखलेनगर, पुणे.
२. बुरशी प्रादुर्भावाच्या तपासणीसाठी भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी राज्यस्तरीय रोग अन्वेषण संस्था, औंध, पुणे.
३. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत पशुवैद्यकीय महाविद्यालयातील प्रयोगशाळा
४. सेंटर फॉर ॲनालिसिस ॲण्ड लर्निंग इन लाईव्हस्टॉक ॲण्ड फुड (काफ), एनडीडीबी, आनंद, गुजरात.
५. नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ ॲनिमल न्युट्रीशन ॲण्ड फिजीऑलॉजी, बेंगलोर
६. शासनमान्य खाद्य विश्लेषण प्रयोगशाळा

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६१०३०१०२८३७९१४५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.10.30 10:29:38 +05'30'

(नि. भा. मराळे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (उत्पादन शुल्क), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
५. सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व जिल्हाधिकारी
१०. सहआयुक्त पशुसंवर्धन, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी राज्यस्तरीय रोग अन्वेषण विभाग, पुणे.
११. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन.
१२. संशोधन संचालक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
१३. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त.
१४. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, खाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, गोखलेनगर, पुणे.
१५. मा.मंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.